Dr. Vijaya . V. Patil.

ISSN : 0976-0385

R.N.I.Regd.No.MAHBIL/2009/37458

# शिक्षणातील मर्मदृष्टी

UGC APPROVED

# Shikshanteel Marmdrushti

A Peer-reviewed Journal For Teacher Education

शिक्षणातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन यांना वाहिलेले नियतकालिक

Vol.: 9th | Issue : 4th | Quarterly : January To March 2018


- Mahatma Gandhi: World Leader
- Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA)
- Techniques of Evaluation
- Study of Religious Value among Violent and Non-violent Male Offenders
- संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास
- परिसरातील जैवविविधतेची जाणीव जागृती – एक अभ्यास
- Relationship between Personality and Marital adjustment among arranged marriage and love marriage coupies
- Study of Social Value among Violent and Non-violent Offenders


संपादक:
डॉ. किशोर चव्हाण

कार्यकारी संपादक:
डॉ. प्रवीण कोठावदे

इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक

# अनुक्रमनिका


| | | |
|---|---|---|
| १. | **Mahatma Gandhi: World Leader**<br>Prof., Dr. V. P. Shikhare | ०५ |
| २. | **Rashtriya Uchchatar Shiksha Abhiyan (RUSA)**<br>Prof. Dr. Kishor Chavan | ०८ |
| ३. | **Techniques of Evaluation**<br>Prof., Dr. Ramprasad S. Kale, Prof., Dr. Digamber Darekar | ११ |
| | **संशोधनात्मक लेख** | |
| ४. | **Study of Religious Value among Violent and Non-violent Male Offenders**<br>Prof., Dr. Digamber Darekar | १७ |
| ५. | **संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास**<br>डॉ. संजीवनी राजेश महाले, डॉ. विजया विनायक पाटील | २० |
| ६. | **परिसरातील जैवविविधतेची जाणीव जागृती – एक अभ्यास**<br>प्रा. कविता प्रदीप तोटे, डॉ. शोभा विजयकुमार कागदे | २५ |
| ७. | **Relationship between Personality and Marital adjustment among arranged marriage and love marriage couples**<br>Dr. P. V. Rasal, Smt. S. S. Kshirsagar | २९ |
| ८. | **Study of Social Value among Violent and Non-violent Offenders**<br>Dr. Ramprasad S. Kale, Dr. DigamberDarekar | ३४ |
| | **शैक्षणिक घडामोडी आणि बातम्या** | ३७ |


या अंकातील लेखकांचे विचार स्वतंत्र आहेत.
त्यास संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

संशोधनात्मक लेख

5

# संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी अभ्यास

**डॉ. संजीवनी राजेश महाले**
सहयोगी प्राध्यापक

**डॉ. विजया विनायक पाटील**
शिक्षणशास्त्र विद्याशाखा
य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक

**सारांश :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठातील एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांच्या अभ्यासकेंद्रावरील संशोधन मार्गदर्शकाचे तीन दिवशीय संशोधन मार्गदर्शनाबाबत प्रशिक्षण कार्यक्रम विद्यापीठात घेण्यात आला. व्याख्यान पद्धतीचा वापर न करता प्रेरक आणि सहकार्यात्मक पद्धतीने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले. प्रशिक्षण उपयुक्तता, नवीन माहिती संशोधन मार्गदर्शनसाठी उपयुक्तता आणि सत्रांची कंटाळवाणे ह्या घटकांनुसार पडताळणी करण्यात आली. सर्व संशोधन मार्गदर्शकांच्या मते हा प्रशिक्षण कार्यक्रम परिणामकारकता राबविण्यात आलेला होता.

**प्रस्तावना :**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे कार्यक्षेत्र हे संपूर्ण महाराष्ट्रभर आहे. विविध शिक्षणक्रमांची अंमलबजावणी ही पारंपरिक विद्यापीठांतर्गत असलेल्या अभ्यासकेंद्रामार्फतच केली जाते. विद्यापीठाच्या शिक्षणशास्त्र विद्याशाखेत एम.ए. (शिक्षणशास्त्र) हा पदव्युत्तर पातळीवरील शिक्षणक्रम राबविला जातो. ह्या शिक्षणक्रमांतर्गत 'संशोधन' हा भाग महत्त्वाचा आहे. कारण त्यास अधिक भारांश देण्यात आलेला आहे. 'संशोधन मार्गदर्शनासाठी प्रत्येक विद्यापीठाची आपापली स्वतंत्र अशी नियमावली आहे. मुक्त विद्यापीठाच्या एम. ए. (शिक्षणशास्त्र) ह्या पदव्युत्तर पातळी वरील संशोधन मार्गदर्शक हे एम. फिल/पीएच. डी. पदवीधारक असतात. त्यांना अध्यापनाचा आणि संशोधन मार्गदर्शनाचा अनुभव असतो व ते 'संमंत्रक' म्हणून ही कार्य करीत असतात. मुक्त विद्यापीठात 'संशोधन कार्य' ह्या घटकांसाठी गुणवत्ता राखण्यासाठी एम.ए. (शिक्षणशास्त्र) च्या संशोधन अहवालांचे परिशीलन केले जाते. ह्या परिशीलनामध्ये जवळ जवळ सर्व अभ्यासकेंद्रावरील संशोधन अहवालांचे समिती मार्फत पुनरमूल्यमापन केले जाते. परिशीलनाच्या वेळी संशोधना अहवालाच्या गुणदानात अभ्यासकेंद्रावर एकवाक्यता दिसून आली नाही. तसेच संशोधनाच्या गुणवत्तेचा विचार करता खूपच त्रुटी आढळल्या. त्यावरून संशोधन मार्गदर्शनासाठी सर्व अभ्यास केंद्रावर एकवाक्यता व गुणवत्ता राहावी ह्यासाठी संशोधन मार्गदर्शकांचे प्रशिक्षण घेण्याची निकड भासली. व त्यानुसार एक प्रशिक्षण कार्यशाळा विद्यापीठात घेण्यात आला. ह्या प्रशिक्षण कार्यक्रम कार्यनितीची परिणामकारकता पाहण्यासाठी ही संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले.

**संशोधन शीर्षक :**

**एम.ए. शिक्षणशास्त्र शिक्षणक्रमांच्या संशोधन मार्गदर्शकांसाठी आयोजित केलेल्या संशोधन मार्गदर्शक प्रशिक्षण कार्यनितीची परिणामकारकता : एक व्यष्टी**

**अभ्यास संशोधनाची उद्दिष्टे :**

१) संशोधन मार्गादर्शक उदबोधन प्रशिक्षण कार्यक्रमाच्या घटकांचा शोध घेणे.

२) सहकार्यात्मक प्रशिक्षण कार्यनितीची उपयुक्तता अभ्यासणे.

३) संशोधन मार्गदर्शन प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाची परिणामकारकता अभ्यासणे.